**वित्तीय वर्ष २०१८-१९ च्या वित्तीय विवरणपत्रातील प्रदेशनिहाय संवितरणाकरिता विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश**

## प्रास्ताविक

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या “महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४” याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविली आहे. दिनांक ०५ सप्टेंबर, २०११ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी “विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११” (यात यापुढे ज्याचा उल्लेख “आदेश” असा करण्यात आला आहे) निर्गमित केला व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करून विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्यायतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करून घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात (पुरवणी अर्थसंकल्पासह) दर्शविण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन

पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे एका मंडळाकडून दुसऱ्या मंडळाकडे न-वळवता येण्याजोगे असतील. आणखी, नियम ८ नुसार राज्य शासन, सर्व क्षेत्रांकरिताच्या विकास खर्चासाठी प्रदेशनिहाय व प्रवर्गनिहाय नियतव्यय व खर्च यांचे विवरणपत्र देखील तयार करील. या विवरणपत्रामध्ये मागील वित्तीय वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व सुधारित खर्च यांचा तसेच, मागील वित्तीय वर्षाच्या अगोदरच्या वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व प्रत्यक्ष खर्च यांचा तपशिल दिलेला असेल.

४. उक्त आदेशाच्या नियम १० नुसार प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था केली जाईल याची राज्यपाल खातरजमा करतील.

## योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे पुनर्वर्गीकरण

५. केंद्र शासनाने घेतलेला निर्णय विचारात घेऊन राज्य शासनाने सर्वंकष मार्गदर्शक तत्वे दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित केली आहेत. सदर शासन निर्णयानुसार अर्थसंकल्पीय खर्च आता “(अ) *अनिवार्य खर्च”* “(ब) *कार्यक्रमांवरील खर्च”* यांमध्ये वर्गीकृत करण्यात येणार आहे.

६. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीचे निदेश देतांना दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेले पुनर्वर्गीकरण विचारात घेण्यात आले होते. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठीच्या निदेशांसाठी देखील पुनर्वर्गीकृत अर्थसंकल्पीय खर्च विचारात घेण्यात आले आहेत. त्यामुळे, निदेशांतर्गत देण्यात येणारी नियतवाटपाची तत्वे नवीन वर्गीकरणाच्या तत्वांवर आधारित आहेत.

## सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थिती

**७.** निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) प्रदेशनिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते **(जोडपत्र-१)**. सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष **₹ ७४१८.०० कोटी** इतका होता. वर्ष २००० मध्ये प्रचलित मापदंड विचारात घेऊन त्याची पुनर्गणना **₹ ६६१८.३७ कोटी** इतकी करण्यात आली होती. सन २००१ पासून हा अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्ह्यांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. एप्रिल १९९४ रोजी असलेल्या निव्वळ पेरणी क्षेत्राच्या संदर्भात निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेची रब्बी समतुल्य (र.स.तु.) एककामध्ये राज्य सरासरी ३५.११% होती. अनुशेषांतर्गत जिल्हांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष सुद्धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दर वाढ यांमुळे भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झाली नाही.

८. निर्देशांक व अनुशेष समितीने मूल्यमापन केलेला भौतिक अनुशेष राज्यातील बुलढाणा, अकोला, वाशिम आणि अमरावती या चार जिल्ह्यांमध्ये सध्या अस्तित्वात आहे. २०१०-११ ते २०१४-१५ वर्षांसाठी अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना तयार करुनही, आणि योजना कालबद्धरित्या सुधारित करुनही, जलसंपदा विभाग या ४ जिल्ह्यांतील सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करु शकला नाही. अद्याप, प्रस्तावित योजनेत विर्निदिष्ट केलेल्या उद्दिष्टांपैकी साध्य अत्यंत कमी झाले आहे. जून, २०१७ अखेर उर्वरित भौतिक अनुशेष १,८७,७३३ हेक्टर (र.स.तु.) एवढा होता **(जोडपत्र-२ पहा )**. या अनुशेषाचे निर्मूलन करण्यासाठी, जलसंपदा विभागाने २०१५-१६ ते २०१८-१९ या चार वर्षांसाठीचा सुधारित अनुशेष निर्मूलन कार्यक्रम सादर केला आहे **(जोडपत्र-३ पहा)**. या कार्यक्रमानुसार, आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ७६,३५७ हेक्टर (र.स.तु.) भौतिक अनुशेष दूर करण्याचे नियोजन होते. **(जोडपत्र -२ पहा)**. तथापि, जलसंपदा विभागाला त्या वर्षात फक्त ६,६९९ हेक्टर (र.स.तु) चे निर्मूलन करणे शक्य झाले. राज्यपाल

यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, अनुशेष निर्मूलन कार्यक्रमाप्रमाणे सिंचन क्षमता निर्मितीचे वर्षनिहाय उद्दिष्टे साध्य होतील. राज्यपाल यांनी निदेशीत केले आहे की, जलसंपदा विभाग, अनुशेष निर्मूलन कार्यक्रमांतर्गत वर्षनिहाय उद्दिष्टे आणि त्यासाठीची कृती योजना, प्रकल्पांची यादी व अनुशेष निर्मूलनाबाबतचे धोरण यांसह, हे निदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत सादर करेल.

## हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी नियतवाटपासंबंधी निदेश

९. जून २०१२ च्या अखेरीस, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, (अमरावती विभाग) आणि हिंगोली ( १९९९ या वर्षी निर्मित) या जिल्ह्यांमध्ये निर्मित सिंचन क्षमतेची टक्केवारी ही जून, १९९४ च्या राज्य सरासरीपेक्षा (म्हणजेच, ३५.११ % या निव्वळ पेरणी क्षेत्राचे निर्मित सिंचन क्षमतेशी असलेल्या टक्केवारीच्या दृष्टीने) कमी होती. शासनाने ही बाब, राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. हिंगोली जिल्ह्याच्या या भौतिक अनुशेषास मान्यता देण्याकरीता शासनाने नियोजन विभागामार्फत प्रस्ताव सादर केला आहे.

१०. शासनाने नियोजन विभागामार्फत सादर केलेल्या दिनांक १६ डिसेंबर २०१६ च्या पत्रानुसार, जून १९९४ मध्ये हिंगोली जिल्ह्यात अस्तित्वात असलेला शिल्लक भौतिक अनुशेष **१५,१६० हेक्टर (प्रमाण रब्बी सम तुल्य मध्ये)** इतका आहे.

११. राज्य शासनाच्या शिफारशीवरुन राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, हिंगोली जिल्ह्यातील भौतिक अनुशेष दूर करण्याकरिता जलसंपदा विभाग आणि जलसंधारण विभागाने कालबध्द कार्यक्रम हाती घ्यावा. शासनाने ५ प्रकल्प हाती घेतले आहेत. जलसंपदा विभागाचे ९ प्रकल्प आणि जलसंधारण विभागाचे ५० प्रकल्प प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले असल्याचे विभागांनी कळविले आहे. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जलसंपदा विभाग व जलसंधारण विभाग या दोन्ही विभागांनी, केवळ अनुशेष म्हणून निश्चित करण्यात आलेल्या

१५,१६० हेक्टर (रब्बी समतुल्य) (र.स.तु.) इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्याच्या मर्यादेत प्रकल्प हाती घ्यावेत किंवा त्यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. यासंदर्भात १५,१६० हेक्टर (र.स.तु.) इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्याच्या मर्यादेपर्यंतच प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात येईल, तसेच हे प्रकल्प तातडीने पूर्ण होतील, याबाबत सुनिश्चिती करण्याकरिता नियोजन विभागाने समन्वय साधावा. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जलसंपदा विभाग हिंगोली जिल्ह्याचा अनुशेष दूर करण्यासाठी पुरेसा निधी मराठवाडा प्रदेशाच्या विभाज्य नियतव्ययातून प्रथम राखून ठेवील. राज्यपाल यांनी आणखी असे ही निदेशित केले आहे की, जलसंधारण विभागाने मागणी केल्याप्रमाणे **₹ ७.०० कोटी** इतका निधी हिंगोली जिल्ह्याचा अनुशेष दूर करण्यासाठी जलसंधारण विभागास स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात यावा. नियोजन विभागाने याबाबत प्रगतीपर अहवाल दर सहा महिन्यांनी सादर करावा.

## आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या सिंचन क्षेत्रासाठीच्या *कार्यक्रमांवरील खर्चाचे* नियतवाटप

**१२.** जलसंपदा विभागाने, संचिका क्रमांक पीएलएन -२०१८/प्र.क्र.५५/ निवसं-१/ द्वारे, असे दर्शविले आहे की, आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये जलसंपदा विभागाकरिता *कार्यक्रमांवरील खर्चा*साठी **₹८२८३.२२ कोटी** इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(क) यापैकी, **₹ ७९०.५४ कोटी** इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प, लाभक्षेत्र विकास, सामाईक योजना (यांत्रिकीकरण व गुणवत्ता नियंत्रण, जलविज्ञान प्रकल्प टप्पा तीन इ.) आणि (आर्थिक वर्ष २०१०-११ साठीच्या निदेशांतील परिच्छेद २२ नुसार घ्यावयाच्या प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे, आणि भूसंपादन कायद्यातील तरतुदी अंतर्गत लोकअदालत अथवा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार भूसंपादन आणि पुनर्वसन यांतील अडचणी मिटविणे यासारख्या योजनांसाठी) निधी राखून ठेवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकारची देयके दिल्यामुळे मंडळनिहाय खर्चामध्ये काही असमतोल निर्माण झाल्यास यापुढील निदेशांमध्ये तो समायोजित करण्यात येईल.

(ख) राज्यपाल यांनी राज्य शासनाच्या शिफारशीनुसार, **५ आंतरराज्य प्रकल्प** म्हणजे भंडारा जिल्ह्यातील बावनथडी, यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा, नांदेड जिल्ह्यातील लेंडी, कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा आणि सिंधुदुर्ग जिह्यातील तिल्लारी, तसेच **गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प** यांसाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या दृष्टीने हे प्रकल्प निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास संमती दिली आहे. आंतरराज्य प्रकल्पांसाठी **₹ ५० कोटी** आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांसाठी **₹ ७०० कोटी** इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे.

(ग) मराठवाडा प्रदेशातील उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील दुष्काळप्रवणता आणि तीव्र पाणी टंचाई लक्षात घेऊन, राज्य शासनाने कृष्णा मराठवाडा पाटबंधारे प्रकल्पाला विशेष दर्जा देण्यासंदर्भात विचाराधीन असल्याबाबत कळविले आहे. सदर प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार येत्या अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पासाठी **₹ ३००.०० कोटी** उपलब्ध करुन देण्याचे जलसंपदा विभागाने प्रस्तावित केले आहे. तसेच, सदर **₹ ३००.०० कोटी** निदेशांच्या बाहेर ठेवण्याबाबत विनंती केली आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी राज्यपाल यांनी ही विनंती स्वीकृत केली आहे.

(घ) प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत प्रकल्पांसाठी लागणाऱ्या तरतुदी सामावून घेण्याच्या उद्देशाने, मुख्यमंत्री यांनी दिनांक ०५ जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये राज्यपाल यांना, या प्रकल्पांसाठी लागणाऱ्या तरतुदी आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० साठी निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यात याव्यात, आणि त्या पुढील वर्षीच्या राज्यपालांच्या निदेशांनुसार समायोजित करण्यात याव्यात, अशी विनंती केली. तथापि, जलसंपदा विभागाने सादर केले आहे की, उपलब्ध विकास

मंडळनिहाय विभाज्य नियतव्यय लक्षात घेवून पुनर्तपासणी केली असता, आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत येणाऱ्या बेंबळा आणि निम्न वर्धा या प्रकल्पांसाठी अनुक्रमे **₹ २०० कोटी** आणि **₹ ३०० कोटी** अतिरिक्त निधीची आवश्यकता राहील. राज्यपाल यांनी, राज्य शासनाच्या शिफारशीनुसार, विदर्भ प्रदेशातील प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत प्रकल्पांसाठी वार्षिक योजना २०१८-१९ मध्ये, पुढील निदेशातील नियतवाटपाच्या तत्वांनुसार इतर प्रदेशांना नुकसान भरुन देण्याच्या अटीच्या अधीन राहून **₹ ५००.०० कोटी**चे नियतवाटप निदेशाच्या बाहेर ठेवण्यास परवानगी दिली आहे. विभागाने वर्ष २०१९-२० मध्ये विदर्भ प्रदेशाच्या अंतिम नियतवाटपातून वरील निधीचे फेर वाटप होईल याची खात्री करावी.

**(च)** उपरोक्त निर्देशित (क), (ख), (ग) आणि (घ) मधील निधी निदेशांच्या बाहेर ठेवण्यात येऊन उर्वरित **₹ ५८९२.६८ कोटी** इतके विभाज्य नियतवाटप जलसंपदा क्षेत्रासाठी *कार्यक्रमांवरील खर्च*साठी उपलब्ध असेल. आदिवासी घटकासाठीचे **₹ ५०.०० कोटी**चे नियतवाटप परिच्छेद १३ (X) मध्ये स्वतंत्ररित्या दर्शविण्यात आले आहे.

**१३.** शासनाने दर्शविलेली निधीची उपलब्धता, अनुशेष निर्मूलनाच्या ४ वर्षांच्या योजनेप्रमाणे लागणारा आवश्यक निधी, आणि एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजा लक्षात घेऊन, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, सिंचन क्षेत्राकरिता *कार्यक्रमांतर्गत खर्च*साठीचे नियतवाटप खालील प्रमाणे आरक्षित करण्यात यावे :-

**(I)** सिंचन क्षेत्रासाठी एकूण नियतवाटपाच्या विभाज्य तरतुदीमधून, ज्या जिल्ह्यांचा भौतिक अनुशेष शिल्लक आहे, त्या अमरावती विभागातील चार जिल्ह्यांसाठी पुरेसा निधी प्रथम राखून ठेवण्यात येईल. अनुशेष निर्मूलनासाठी निश्चित केलेल्या प्रकल्पांची कामांची

प्रगती लक्षात घेऊन राज्यपालांचे असे मत आहे की, या चार जिल्ह्यांसाठी **₹ ७५० कोटी** इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.

(II) वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष दूर करण्याकरिता आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यांतील प्रत्येक घटकाच्या सम भारांकाच्या आधारे करावे. तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी **जोडपत्र ५ अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

(III) मागील निदेशांमध्ये, आर्थिक वर्ष २०१५-१६ पर्यंतच्या खर्चाच्या आधिक्य / तुटीच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या अंमलात आणण्यात आल्या आहेत. निदेशांमध्ये या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या तीन वर्षात समान टप्प्यात करण्यात याव्यात असे दर्शविले आहे. त्याप्रमाणे, दिनांक ११ मार्च २०१७ रोजीच्या निदेशांतील जोडपत्र ५ ड मध्ये दर्शविल्याप्रमाणे दुरूस्त्या आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता लागू राहतील.

(IV) मुख्यमंत्री यांनी, दिनांक २० जुलै २०१७ रोजीच्या पत्रान्वये, पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणारा **₹** ५०० कोटी अतिरिक्त निधी विदर्भ प्रदेशातील सिंचन प्रकल्पांना देण्याकरिता आणि राज्यपाल यांच्या निदेशांनुसार तीनही प्रदेशांमध्ये समन्यायतेने नियतवाटप करण्यासाठी आवश्यक समायोजन पुढील वर्षामध्ये करण्याबाबत परवानगी द्यावी अशी विनंती केली होती. राज्यपाल यांनी शासनास असे निदेश दिले होते की, या नियतवाटपासंदर्भात, सिंचन क्षेत्रासाठीच्या नियतवाटप तत्वानुसार, आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये विदर्भ प्रदेशाच्या अंतिम विभाज्य नियतव्ययातून **₹ ३७१.७५ कोटी** समायोजित करुन इतर दोन प्रदेशांना देण्यात यावे. हे समायोजन **जोडपत्र ६ अ** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

(V) मुख्यमंत्री यांनी, दिनांक ७ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये, पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणारा **₹** २०० कोटी अतिरिक्त निधी तापी सिंचन विकास महामंडळ (TIDC) अंतर्गत सिंचन प्रकल्पांना देण्याकरिता आणि राज्यपाल यांच्या निदेशांनुसार तीनही प्रदेशांमध्ये समन्यायतेने नियतवाटप करण्यासाठी आवश्यक समायोजन पुढील वर्षामध्ये करण्याबाबत परवानगी द्यावी अशी विनंती केली होती. राज्यपाल यांनी शासनास असे निदेश दिले होते की, या नियतवाटपासंदर्भात, सिंचन क्षेत्रासाठीच्या नियतवाटप तत्वानुसार, आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये उर्वरित महाराष्ट्र प्रदेशाच्या अंतिम विभाज्य नियतव्ययातून **₹ ९६.३८ कोटी** समायोजित करुन इतर दोन प्रदेशांना देण्यात यावे. हे समायोजन **जोडपत्र ६-अ** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

(VI) जोडपत्र ६ अ मध्ये अनुशेष दूर करण्यासाठी लागणारा नियतव्यय, प्रदेशनिहाय लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यांच्या प्रमाणाच्या आधारे उर्वरित नियतव्यय आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ साठीच्या प्रदेश निहाय दुरुस्त्या यासाठीचा आवश्यक निधी यानुसार विभाज्य निधीचे प्रदेशनिहाय नियतवाटप दर्शविण्यात आले आहे.

(VII) मुख्यमंत्री यांनी त्यांच्या पत्र क्र. CDA २०१७/२२४/१७/works, दिनांक २१ सप्टेंबर २०१७ अन्वये विनंती केली होती की, विस्तारीकरण, पुनर्नवीकरण व आधुनिकीकरण यांसाठी अर्थसंकल्पीय तरतुदींच्या २ टक्के ही मर्यादा शिथील करण्यात यावी. राज्यपाल यांनी मुख्यमंत्री यांच्या सदर पत्रात नमूद केलेल्या प्रकल्पांसाठी म्हणजे अपर गोदावरी खोरे अंतर्गत प्रकल्प आणि जायकवाडी प्रकल्पाचे लाभक्षेत्र यांसाठी विनंती मान्य केली आहे.

(VIII) राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, अनुशेषांतर्गत जिल्ह्यांची नक्त प्रत्याक्षी मूल्य (NPV) आणि इतर बाबींची गरज विभाज्य नियतव्ययातून भागविण्यात यावी.

(IX) राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीचे प्रदेशनिहाय वितरण त्या त्या प्रदेशाची आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उपयोजनेखालील* क्षेत्रफळ यांना प्रत्येकी ५० टक्के भारांक देऊन करण्यात यावे. जनगणना २०११ नुसार आदिवासी लोकसंख्या यासाठी उपयोगात आणण्यात आली आहे. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीची तीन प्रदेशांसाठी हिश्यांची टक्केवारी **जोडपत्र ५ ब** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

(X) आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत नियतव्यय **₹ ५० कोटी** आहे. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीचे नियतवाटप **जोडपत्र ६ ब** मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

(XI) त्यामुळे, सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय अंतिम नियतवाटप खालील तक्ता १ मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

**तक्ता १.**

**आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी सिंचन क्षेत्राचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय अंतिम नियतवाटप**

(₹ कोटी)

| प्रदेश | कार्यक्रमांवरील खर्चातील उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप (जोडपत्र ६ अ पहावे) | आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीचे नियतवाटप (जोडपत्र ६ ब पहावे) | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| विदर्भ | १४९३.६३ | २१.०४ | १५१४.६७ |
| मराठवाडा | १४४९.२४ | ०२.६९ | १४५१.९३ |
| उर्वरित महाराष्ट्र | २९४९.८१ | २६.२७ | २९७६.०८ |
| **एकूण** | **५८९२.६८** | **५०.००** | **५९४२.६८** |

* (जरी आदिवासी उपयोजनेचे पुनर्वर्गीकरण करण्यात आले असले तरी पूर्वीच्या संदर्भानुसार आदिवासी उपयोजने खालील क्षेत्र गृहीत धरण्यात आले आहे.)

१४. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले परिच्छेद १३ (I) मधील नियतवाटप हे, कार्यक्रमांवरील खर्चाच्या उर्वरित विभाज्य नियतव्ययातून या जिल्ह्यांसाठी जलसंपदा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय यांतून या जिल्ह्यांकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या एकत्रित नियतवाटपातून या जिल्ह्यांमधील अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या कामांसह, चालू कामांसाठी लागणाऱ्या निधीची पूर्तता होईल, याची खात्री करावी.

१५. आणखी, राज्य शासनाने सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबिल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वरील परिच्छेद १३ (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरिक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण **जोडपत्र ५ अ** आणि **जोडपत्र ५ ब** मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल.

१६. प्रधान सचिव (जलसंपदा) यांनी तीनही विभागातील खर्चाचा त्रैमासिक आढावा घ्यावा आणि जशी गरज भासेल तेव्हा खर्चाबाबतची सूत्रे तंतोतंत जुळण्यासाठी सुधारात्मक उपाय योजावेत.

१७. राज्यपाल यांनी अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (वित्त) व प्रधान सचिव (जलसंपदा) यांची समिती प्रकल्पनिहाय नियतवाटप अंतिम करील असे यापूर्वी कळविले होते. शासनाने दिनांक ०४ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पांचा अग्रक्रम ठरविणे, भौतिक / आर्थिक नियोजन आणि अर्थसंकल्पीय तरतुदींचे पुनर्विनियोजन याबाबतचे अधिकार प्रधान सचिव (जलसंपदा) यांना प्रदान करण्याबाबत राज्यपाल यांना विनंती केली आहे. राज्यपाल यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिली आहे. तथापि, राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की,

प्रकल्पनिहाय निधीचे वाटप करतांना यासाठी स्पष्ट निकष असावेत ज्यामध्ये पूर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम देता येईल. तसेच, भूसंपादन, पुनर्वसन, नक्त प्रत्याक्षी मूल्य आणि इतर मान्यतांकरिता निधीच्या आवश्यकतेबाबत अग्रक्रम देण्यात यावा. कोणताही निधी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे तसेच, अनुशेष नसलेल्या जिल्ह्यातून बिगर अनुशेष जिल्ह्यांकडे वळविता येणार नाही. राज्यपाल यांनी असेही निदेश दिले आहेत की, जर निधींचे पुनर्विनियोजन करावे लागल्यास त्याची सविस्तर कारणे नमूद करावीत.

१८. तीनही प्रदेशांमध्ये चालू असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी **जोडपत्र-४** मध्ये दर्शविण्यात आला आहे. चालू प्रकल्पांची शिल्लक किंमत तसेच, साधनसंपत्ती “पसरली” जाण्याचे धोके लक्षात घेता, राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता, निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांचे काम हाती घेण्यात येऊ नये. हे उत्तरदायित्व लक्षात घेता, हे निदेश सुरूच राहतील.

१९. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मोठ्या प्रमाणावर रिक्त पदांबाबत राज्यपाल यांना अवगत करण्यात आले आहे. रिक्त पदांचा अनिष्ट परिणाम अनुशेषांतर्गत जिल्ह्यातील चालू प्रकल्पांच्या प्रगतीवर होत आहे. म्हणून, दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या निदेशांतील परिच्छेद १८ मध्ये राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, राज्य शासन इतर प्रदेशातून बदली, नवीन भरती, पदोन्नती, इत्यादि मार्गाने चार अनुशेषांतर्गत जिल्ह्यातील सध्या रिक्त असलेली पदे भरेल. जलसंपदा विभागाच्या मागील अहवालानुसार वर्ष २०१६-१७ मध्ये अमरावती विभागांतर्गत गट-अ च्या एकूण १६७ पदांपैकी २२ पदे (१३.१७%) आणि गट ब च्या ५४३ पदापैकी १०४ पदे (१९.१५ %) रिक्त होती. जलसंपदा विभागाच्या अद्ययावत अहवालानुसार अमरावती विभागांतर्गत गट-अ च्या एकूण १५६ पदांपैकी २८ पदे (१७.९४%) आणि गट ब च्या ५१० पदापैकी १३४ पदे (२६.२७%) रिक्त आहेत. राज्यपाल यांचे निदर्शनास आले आहे की, चार अनुशेषांतर्गत

जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदे असणे हे निधी कमी खर्च होण्याच्या इतर कारणांपैकी एक कारण आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, चार अनुशेषांतर्गत जिल्ह्यांतील रिक्त पदे हे निदेश निर्गमित झाल्यानंतर ४ महिन्यांत निश्चितपणे भरण्यात यावीत.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती

**२०.** दिनांक ०१ एप्रिल, १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमध्ये परिगणना केलेला एकंदरीत अनुशेष हा **₹ ६,५८८.७७** कोटी **(जोडपत्र-१)** इतका होता. वित्तीय वर्ष १९९५-९६ पासून दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंतचा अनुशेष दूर करण्यावरील झालेला खर्च वजा केल्यानंतर सिंचनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतील अनुशेष **₹** १३४.८० कोटी इतका परिगणित करण्यात आलेला आहे (जोडपत्र-७). वित्तीय अनुशेष फक्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये अस्तित्वात आहे.

## ऊर्जा क्षेत्र : कृषी पंपसंचांना वीज पुरवठा करणे

**२१.** ऊर्जा विभागाने कळविले होते की, दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी, रत्नागिरी जिल्ह्याचा ८३०० कृषी पंप आणि गडचिरोली जिल्ह्याचा ४७१ कृषी पंप विद्युतीकरणाचा अनुशेष होता.

**२२.** प्रधान सचिव (ऊर्जा) यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे की, गडचिरोली जिल्ह्याच्या भौतिक अनुशेषाचे मार्च, २०१८ पर्यंत निर्मूलन होईल. तथापि, रत्नागिरी जिल्ह्याचा कृषी पंप विद्युतीकरणाचा अनुशेष असेल. हा अनुशेष दूर करण्यासाठी, विभागाने २०१८-१९ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील २४०० कृषी पंप विद्युतीकरणाचे उद्दिष्ट प्रस्तावित केले आहे. यासाठी विभागाने **₹ ५०.००** कोटीची मागणी केली आहे. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये या योजनेसाठी प्रदेशनिहाय नियतव्ययाचे विवरण **जोडपत्र -८** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

## उच्च व तंत्रशिक्षण : तंत्रनिकेतन

**२३.** प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये सादर केले आहे की, तंत्रनिकेतन उपक्षेत्रांतर्गत निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केलेला २८१८ विद्यार्थी जागांचा भौतिक अनुशेष ०१ एप्रिल, १९९९ ते मार्च, २०१३ या कालावधीत टप्प्या-टप्प्याने संपूर्णत: निर्मूलित करण्यात आला आहे. पत्रासोबत विद्यार्थी जागांच्या अनुशेष निर्मुलनाचा वर्षनिहाय व जिल्हानिहाय माहितीचा तपशिलही सादर करण्यात आला आहे. अनुशेष योजनेंतर्गत निधी आता संस्थात्मक अनुशेष निर्मूलनासाठी देण्यात येत आहे. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे की, शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथील कर्मशाळा आणि मुलांचे वसतीगृह यांची बांधकामे या आर्थिक वर्षाच्या अखेरीस पूर्ण होतील. आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये विभागाने शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड येथील कार्यशाळा, मुलांचे वसतिगृह आणि अनुशेष निर्मूलन कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या चार शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालये म्हणजेच, उर्वरित महाराष्ट्रातील विक्रमगड आणि नंदुरबार, मराठवाड्यातील हिंगोली आणि विदर्भातील गोंदिया येथील आस्थापना खर्चासाठी **₹ ३६.८१** कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे.

## कौशल्य विकास आणि उद्योजकता: औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्र माध्यमिक शाळा

**२४.** तंत्र माध्यमिक शाळा उपक्षेत्रामध्ये मुंबई शहर (३०९ जागा) आणि मुंबई उपनगर जिल्हा (२४० जागा) असा एकूण ५४९ विद्यार्थी जागांचा अनुशेष शिल्लक आहे. विभागाने मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांतील तंत्र माध्यमिक शाळांमध्ये १५ नवीन पदे निर्माण करण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्तावित केले होते. राज्यपाल यांनी यासाठी तात्काळ कार्यवाही करण्याचे निदेशित केले आहे, ज्यामुळे या उपक्षेत्रातील अनुशेष लवकरात लवकर दूर होऊ शकेल. विभागाने आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये मालेगाव (नाशिक), कामठी (नागपूर) आणि खेड (रत्नागिरी) येथील तंत्र माध्यमिक शाळांच्या इमारत बांधकामासाठी **₹ २.००** कोटींची मागणी प्रस्तावित केली होती.

विभागाने सादर केले आहे की, मालेगाव (नाशिक) येथील इमारत बांधकाम पूर्ण झाले असून त्यामध्ये काही पूरक कामे जसे विद्युतीकरण, अंतर्गत रस्ते, कुंपणभिंत, प्रवेशद्वार, पावसाच्या पाण्याची साठवण, बागकाम इत्यादी कामे अपूर्ण आहेत. विभागाने *२०१८-१९* करिता *कार्यक्रमांवरील खर्चांतर्गत* अनुशेष निर्मूलन योजनेतून सदर कामांकरिता **₹ १.४५ कोटी** निधीची मागणी केली आहे. विभागाने आणखी असेही सादर केले आहे की, कामठी आणि खेड येथील माध्यमिक शाळांसाठी भूसंपादन झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. विभागाने दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये २०१८-१९ च्या *कार्यक्रमावरील खर्चा* अंतर्गत अनुशेष योजनेखाली तंत्र माध्यमिक शाळा, कामठी येथील बांधकामाकरिता **₹ २.०० कोटी** आणि तंत्र माध्यमिक शाळा, खेड येथील बांधकामाकरिता **₹ ०.५० कोटीची** मागणी केली आहे.

**२५.** औद्योगिक प्रशिक्षण संस्था उपक्षेत्रामध्ये विभागाने वर्ष २०१७-१८ मध्ये लोअर परेल (जिल्हा मुंबई), सेलू (जिल्हा परभणी) आणि कामठी (जिल्हा नागपूर) येथील चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी **₹ ७.००** कोटींची मागणी प्रस्तावित केली होती. तथापि, २०१७-१८ मध्ये देखील या योजनेखाली काहीही खर्च झाला नाही. विभागाने सादर केले आहे की, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कामठी (जिल्हा नागपूर) येथील बांधकामांसाठी **₹ १४.०३** कोटींचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित केले आहे. विभागाने आणखी असेही सादर केले आहे की, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेलू (जिल्हा परभणी) येथील भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर असल्याने विभागाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेलू येथील बांधकामासाठी निधीची मागणी प्रस्तावित केलेली नाही. विभागाने आणखी असे सादर केले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या नवीन विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोअर परेल या संस्थेचे बांधकाम प्रस्तावित असलेल्या जमिनीचे आरक्षण बदलले आहे. विभागाने कामठी (जिल्हा नागपूर) येथील चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी **₹ ४.०० कोटी** आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोअर परेल (जिल्हा मुंबई) येथील बांधकामासाठी **₹ ०.७५ कोटीची**

मागणी प्रस्तावित केली आहे. राज्यपाल यांचे निदेशांनुसार, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठीचे प्रदेशनिहाय व उपक्षेत्रनिहाय नियतवाटप **जोडपत्र-८** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

## सार्वजनिक आरोग्य सेवा

**२६.** दिनांक ०१ एप्रिल, २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये **₹ १३५३.६७ कोटी** इतका वित्तीय अनुशेष होता. ३१ मार्च, २०१७ पर्यंतचा खर्च विचारात घेता, या क्षेत्रामध्ये **₹ १३४.८० कोटींचा** वित्तीय अनुशेष अद्याप शिल्लक आहे. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की, गेल्या ६-७ वर्षामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला अनुशेष निर्मूलनासाठी नियतवाटप केलेल्या निधीपैकी पुरेसा खर्च करणेही शक्य झाले नाही. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये देखील ₹९१.०९ कोटी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आले असून ₹९१.०९ कोटी मार्च, २०१८ पर्यंत संपूर्णत: खर्च होईल, अशी अपेक्षा असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे. राज्यपाल यांनी सार्वजनिक आरोग्य हे वित्तीय अनुशेष शिल्लक असलेले एकमेव क्षेत्र असल्याबद्दल काळजी व्यक्त केली आहे. म्हणून, राज्यपाल यांनी पुन:श्च असे निदेशित केले आहे की, प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांनी अनुशेष निर्मूलन कार्यक्रमांतर्गत २०१८-१९ साठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदी निश्चितपणे खर्च होतील याबाबत सविस्तर कार्यक्रम तयार करावा. सदर कृती कार्यक्रम हे निदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत राज्यपाल यांचे अवलोकनार्थ सादर करावा.

**२७.** राज्यपाल यांनी विभागाने केलेल्या विनंतीनुसार, वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रूग्णवाहिका, उपकरणे व इतर साधनसामुग्री आणि फर्निचर याकरिता **₹ १०८.३८ कोटी** इतके नियतवाटप करण्याबाबत निदेश दिले आहेत. सदर नियतवाटपाचे प्रदेशनिहाय विवरण **जोडपत्र-८** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियतवाटप

२८. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता *कार्यक्रमांवरील खर्चा*मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी **₹ २०३.८९ कोटी** इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सन २०१८-१९ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालील तक्ता २ प्रमाणे करण्यात यावे.

### तक्ता २.

**२०१८-१९ साठी सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय अंतिम नियतवाटप**

| अ.क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (₹ कोटी) (जोडपत्र ८) |
|---|---|---|
| १. | विदर्भ | २२.०९ |
| २. | मराठवाडा | २९.०० |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | १५२.८० |
| **एकूण** | | **२०३.८९** |

२९. प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्रनिहाय नियतवाटप **जोडपत्र** ८ मध्ये दर्शविलेले आहे. राज्यपाल यांनी निदेशित केले आहे की, सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि त्या विभागाच्या नियमित कार्यक्रमांवरील खर्चाच्या नियतव्ययापेक्षा जास्तीचे असावे.

## कार्यक्रमांवरील खर्चाच्या उर्वरित निधीच्या वाटपाची तत्वे

३०. सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियतवाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर, *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित

करण्यात यावा. असे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. *कार्यक्रमावरील खर्चा*च्या उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियतवाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही कार्यक्रमावरील खर्चाच्या उर्वरित नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधीन राहील.

**३१.** दिनांक ११ मार्च २०१७ च्या परिच्छेद ३१ मध्ये राज्यपाल यांनी दर्शविले होते की, आर्थिक वर्ष २०१७-१८ हे संक्रमण वर्ष असल्यामुळे परिच्छेद ३० मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे नियतव्यय वाटपाचे तत्व *कार्यक्रमांवरील खर्चा*साठी लागू असेल. राज्यपाल यांनी अशी इच्छा व्यक्त केली होती की, वित्त विभागाने अनिवार्य खर्चातील विकासात्मक भागाचा तपशिल ही काढावा, त्यायोगे तो तपशिल आगामी निदेशांपासून नियतव्यय वाटपाची तत्वे ठरविताना गृहित धरता येऊ शकेल. राज्यपाल यांनी असे निदेशीत केले होते की, वित्त विभागाने अनिवार्य खर्चातील विकासात्मक खर्चाच्या भागाचा तपशिल राज्यपाल यांच्या अवलोकनार्थ सादर करावा. मात्र सदर तपशिल अद्याप अप्राप्त आहे. राज्यपाल यांनी पुन्हा एकदा निदेशित केले आहे की, वित्त विभागाने हा तपशिल दिनांक १ जून, २०१८ पर्यंत सादर करावा.

## विकास मंडळे

**३२.** प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन जिल्ह्यांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा, हे निदेश दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशांनुसार चालू राहतील. जिल्ह्यांची निवड करताना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यांना प्राधान्य द्यावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्देशानुसार मंडळे इतर अभ्यासही घेऊ शकतात. वरील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी प्रत्येक विकास मंडळासाठी **₹ २.०० कोटी** राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. त्यानुसार मंडळांच्या आवश्यकतेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन द्यावा.

## प्रदेशनिहाय विकासाचा समतोल यावरील तज्ञ समिती

**३३.** महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल ऑक्टोबर २०१३ मध्ये राज्यपाल यांना सादर केला आहे. राज्यपाल यांनी या अहवालाबाबत राज्य शासनाचे मत मागविले आहे. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी स्विकारण्यासंदर्भात शासन निर्णय, दिनांक १७ जानेवारी, २०१५ नुसार मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. राज्यपाल यांची अशी अपेक्षा आहे की, राज्य शासन सदर अहवाल व त्यातील शिफारशी, नियतवाटपांची तत्वे यांसह विचारार्थ घेईल आणि यावरील आपली मते तातडीने राज्यपाल यांच्या विचारार्थ सादर करेल.

## अनुच्छेद ३७१ (२) (ग) नुसार राज्यपालांची विशेष जबाबदारी

**३४.** संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (ग) आणि विकास मंडळे आदेश २०११ च्या खंड १० नुसार, राज्यपाल यांना प्रत्येक विकास मंडळ क्षेत्रांतर्गत तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सुविधा आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायी व्यवस्था करण्याची विशेष जबाबदारी आहे.

**३५.** दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ च्या निदेशातील परिच्छेद ३१ नुसार, राज्यपालांनी विकास मंडळ क्षेत्रनिहाय तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यासाठीच्या पुरेशा सुविधा आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या संधी याबाबतच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. राज्यपाल यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गेल्या तीन शैक्षणिक वर्षासाठीची तंत्र शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या राज्य आणि केंद्रशासन तसेच, अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्थाकडील विद्यार्थी प्रवेश क्षमता आणि विद्यार्थी प्रवेशांचे क्षेत्रनिहाय प्रतिनिधीत्व याबाबतची माहिती सादर करण्याचे निदेश दिले होते. शासनाने शैक्षणिक वर्ष

२०१५-१६ मधील व्यावसायिक तंत्र पदवीपूर्व पाठ्यक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सादर केली होती. राज्यपाल यांनी दिनांक ११ मार्च २०१६ च्या निदेशात असे निदेश दिले होते की, शासनाने अशा पाठ्यक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रदेशनिहाय प्रमाणात असलेल्या तफावती संदर्भात मार्ग सुचविण्यासाठी समिती गठित करावी. ही समिती विविध प्रदेशात स्थापन झालेल्या उच्च व तंत्र शिक्षण संस्थांच्या संख्येतील प्रादेशिक असंतुलनाचा अभ्यास करील आणि प्रादेशिक असंतुलन सुधारण्याबाबत उपाय सुचवेल. राज्यपाल यांनी शासकिय परिपत्रक दिनांक २० जानेवारी, २०१७ नुसार संचालक, तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली असल्याचे लक्षात घेतले आहे. सदर समिती या उपायांबाबतचा अहवाल हे निदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्यात सादर करील अशी अपेक्षा राज्यपाल यांनी व्यक्त केली आहे.

**३६.** राज्यपाल यांनी सामान्य प्रशासन विभागाला राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये क्षेत्रनिहाय प्रतिनिधित्वाबाबतची आकडेवारी सादर करण्याबाबतही निदेशित केले होते. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था आणि सरकार पुरस्कृत महामंडळे याबाबतची माहितीही यासाठी विचारात घ्यायची होती. राज्यपाल यांनी लक्षात घेतले आहे की, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे वित्त मंत्री यांचे अध्यक्षतेखाली याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, उपसमितीचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्यात यावा.

## निदेशांचे अनुपालन

**३७.** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम २१ (१) व (२) मधील तरतुदीनुसार, राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेष निर्मूलनाची विशेष जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर आहे. राज्यपाल यांनी अमरावती विभागातील चार जिल्हे आणि

मराठवाडा विभागातील हिंगोली जिल्हा येथील सिंचन अनुशेष निर्मूलनाबाबत राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने अनुशेष असलेल्या जिल्ह्यांतील सिंचन क्षेत्राशी संबंधित पुनर्विनियोजनाचे अधिकार, पुरेशा कर्मचारी वर्गाची उपलब्धता, भूसंपादन आणि पुनर्वसन या बाबींचा नियतकालिक आढावा घ्यावा. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने निदेशांच्या अंमलबजावणीबाबत पूर्तता अहवाल, काही शिफारशी असल्यास त्यांसह राज्यपालांना तिमाही सादर करावा.

३८. राज्यपाल यांनी त्यांच्या दिनांक १० मार्च, २०११ च्या निदेशामध्ये सिंचन क्षेत्रासह सर्व क्षेत्रांचे प्रदेशनिहाय नियतव्यय आणि खर्चाबाबत तपशिलवार माहिती संकलित करण्याची कार्यप्रणाली विकसित करण्याबाबत आदेशित केले होते. राज्यपाल यांनी निदेशित केले होते की, नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१०-११ पासूनची प्रदेशनिहाय योजनांतर्गत खर्चाची आकडेवारी प्रसिद्ध करावी आणि प्रदेशांतर्गत आधिक्य किंवा निधी वळविणे यांचे प्रमाण दर्शवावे. या निदेशांच्या अनुपालनांतर्गत नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्ष २०१२-१३ ची, तर आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन २०१३-१४ ची माहिती सादर केली आहे. नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१०-११, २०११-१२ आणि २०१४-१५ ची संकलित माहिती सन २०१६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात सादर केली असून आर्थीक वर्षे २०१५-१६ ची माहिती २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात सादर केली आहे. ही सर्व माहिती विभागाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली आहे. राज्यपाल यांनी प्रदेशनिहाय योजनांतर्गत खर्चाची आर्थिक वर्ष २०१६-१७ ची संकलित माहिती २०१८ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात प्रसिद्ध करावी असे निदेश दिले आहेत.

३९. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) आणि आदेशातील नियम ७ नुसार योजनेतर विकास खर्चाचे प्रदेशनिहाय समन्यायी वाटप देखील राज्यपाल यांच्या

कार्यकक्षेत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी वित्त विभागाला योजनेतर खर्चाची आकडेवारीसुद्धा प्रसिद्ध करण्याविषयी दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशांमध्ये निदेश दिले होते. हे निदेश १३ मार्च, २०१३, १५ फेब्रुवारी २०१४ आणि १० मार्च, २०१५ च्या निदेशांमध्ये पुनःश्च देण्यात आले होते. वित्त विभागाने आर्थिक वर्ष २०११-१२ आणि २०१२-१३ साठीची प्रदेशनिहाय खर्च (योजनेतर) ची माहिती सादर केली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षांची प्रदेशनिहाय योजनेतर विकास खर्चाची माहिती सादर झालेली नाही. गत वर्षीचे प्रदेशनिहाय योजनांतर्गत आणि योजनेतर खर्चाचे संकलन जुलै, २०१८ पर्यंत करण्यात यावे असे निदेश आहेत.

४०. राज्यपाल यांनी निदेश दिले आहेत की, प्रदेशनिहाय कार्यक्रमांवरील खर्चाची आकडेवारी दरवर्षी लवकरात लवकर प्रकाशित करावी. राज्यपाल यांनी असेही निदेशित केले आहे की, ही आकडेवारी “ऑन लाईन” ठेवण्यात यावी.

४१. दिनांक १३ मार्च, २०१३ च्या निदेशातील परिच्छेद ३७ नुसार, नियोजन विभागाने अर्थसंकल्प पत्रकांतील अविभाज्य खर्चाची बाबनिहाय पुनर्तपासणी करावी आणि शक्य असेल तेथे त्या त्या प्रदेशांसाठी खर्च दर्शवावा असे राज्यपाल यांनी निदेशित केले होते. दिनांक १० मार्च, २०१५ च्या परिच्छेद ३९ मध्ये राज्यपाल यांनी पुनःश्च असे निदेशित केले आहे की, बाबनिहाय खर्चाचे वर्गीकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत ज्यायोगे कोणतीही विभाज्य बाब चुकीने अविभाज्य बाब म्हणून गणली जाणार नाही याची खात्री होईल. दिनांक ११ मार्च, २०१६ च्या परिच्छेद ४४ मध्येही अशाच प्रकारचे निदेश देण्यात आले होते. सदर वर्गीकरणाचा तपशिल जुलै, २०१६ पर्यंत राज्यपालांना सादर करावा असे राज्यपाल यांचे निदेश होते. तथापि, या निदेशांचे पालन अद्याप झालेले नाही. वार्षिक विवरणपत्रातील वर्गीकरणामधील बदल विचारात

घेता वित्त विभागाला असे निदेश देण्यात येत आहेत की, कार्यक्रमांवरील खर्चातील अविभाज्य घटक शक्यतो कमीत कमी ठेवण्यात यावा आणि योग्य पद्धतीने वर्गीकृत करावा.

४२. राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील अनुशेष निर्मूलनासंदर्भातील सर्व बाबींचा त्रैमासिक आढावा घ्यावा व अनुशेष निर्मूलनांतर्गत कामातील प्रगतीबाबत लक्ष ठेवावे.

४३. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, मुख्य सचिवांनी चालू तसेच पूर्वीच्या निदेशातील अनुपालनाचा आढावा घ्यावा आणि धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे शासनस्तरावर योग्य निराकरण करावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

स्वा /-

**(बी. वेणुगोपाल रेड्डी)**
**राज्यपालांचे सचिव**

**राजभवन, मुंबई.**
**दिनांक: ०१ मार्च, २०१८**

# जोडपत्र १

## निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केल्यानुसार दिनांक ०१ एप्रिल, १९९४ रोजीचा प्रदेशनिहाय वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| अ.क्र. | प्रदेश | सिंचन | इतर अनुशेष क्षेत्र | एकूण अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १. | विदर्भ | ४०८३.०० (५५.०४%) | २५४१.०२ (३८.५७%) | ६६२४.०२ (४७.६०%) |
| २. | मराठवाडा | २४०१.०० (३२.३७%) | १६०३.५५ (२४.३४%) | ४००४.५५ (२८.७७%) |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | ९३४.०० (१२.५९%) | २४४४.२० (३७.०९%) | ३३७८.२० (२३.६३%) |
| **एकूण** | | **७४१८.०० (१००%)** | **६५८८.७७ (१००%)** | **१४००६.७७ (१००%)** |

आधार: निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल

# जोडपत्र २

## जून, २००८ पासून अमरावती विभागातील दूर झालेला भौतिक अनुशेष (सिंचन क्षेत्र)

## जून २००७ चा अनुशेष ३,३८,०७० हेक्टर

| वर्ष | उर्वरित अनुशेष (हेक्टर र.स.तु. मध्ये) | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष (हेक्टर र.स.तु. मध्ये) |
|---|---|---|
| जून २००८ | २,९१,३७० | ४६,७०० |
| जून २००९ | २,६३,४५३ | २७,९१७ |
| जून २०१० | २,५७,५१८ | ५,९३५ |
| जून २०११ | २,४७,९४८ | ९,५७० |
| जून २०१२ | २,३४,०१९ | १३,९२९ |
| जून २०१३ | २,२७,२६९ | ६,७५० |
| जून २०१४ | २,२३,७०५ | ३,५६४ |
| जून २०१५ | २,१४,२६९ | ९,४३६ |
| जून २०१६ | १,९४,४३२ | १९,८३७ |
| जून २०१७ | १,८७,७३३ | ६,६९९ |

आधार: जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे अहवाल

# जोडपत्र ३

## सुधारित भौतिक अनुशेष निर्मूलन कार्यक्रम (सिंचन क्षेत्र)*

(हेक्टर र.स.तु.)

| जिल्हा | १ जुलै, २०१५ रोजी शिल्लक भौतिक अनुशेष | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. अमरावती | ७७१०५ | ८३०८ | २६७०२ | २९०२६ | १९८५० | ८३८८६ |
| २. अकोला | ४७५१६ | २१८९ | २७४० | ३८५६९ | ७६६३ | ५११६१ |
| ३. वाशिम | २८४३१ | ९४९१ | १८४५४ | ३७१४ | ७७३ | ३२४३२ |
| ४. बुलढाणा | ६१२१७ | ७४०० | १०२६६ | ५०४८ | ४१०५६ | ६३७७० |
| **एकूण विभाग** | **२,१४,२६९** | **२७,३८८** | **५८,१६२** | **७६,३५७** | **६९,३४२** | **२,३१,२४९** |

* जलसंपदा विभागाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची आढावा बैठकी दरम्यान आणि मा. राज्यपाल यांनी बोलाविलेल्या दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये सादर केल्यानुसार

# जोडपत्र ४

## चालू सिंचन प्रकल्पांची शिल्लक किंमत

| अ. क्र. | प्रदेश | दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजीची प्रकल्प संख्या | दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजीची शिल्लक किंमत (₹ कोटीत) @ |
|---|---|---|---|
| १. | विदर्भ | १४९ | ३३६५६.२२ |
| २. | मराठवाडा | ६१ | १४८३२.३६ |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | १४९ | ३५६२८.८० |
| | एकूण | ३५९ | ८४११७.३८ |

@ तात्पुरती किंमत.

आधार: जलसंपदा विभाग

# जोडपत्र ५ अ

*कार्यक्रमावरील खर्च* २०१८-१९ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्त्वे दर्शविणारे विवरणपत्र

| विभाग | लोकसंख्या* (२०११ जनगणना) | लोकसंख्येची टक्केवारी | निव्वळ पेरलेले क्षेत्र # (हजार हेक्टर) | निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २३००३१७९ | २३.०३% | ५१०६.८ | २८.२७% | २५.६५% |
| मराठवाडा | १८७२७७४८ | १८.७५% | ४७५५.९ | २६.३३% | २२.५४% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५८१६३५९८ | ५८.२३% | ८१९९.३ | ४५.४०% | ५१.८१% |
| **एकूण** | **९९८९४५२५** | **१००%** | **१८०६२.०** | **१००%** | **१००%** |

* आधार- जणगणना २०११ # आधार- निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल खंड एक

# जोडपत्र ५ ब

*कार्यकमांवरील खर्च* २०१८-१९ मधील सिंचन क्षेत्र- आदिवासी घटकातील नियतवाटपाची तत्त्वे दर्शविणारे विवरणपत्र

| प्रदेश | २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या | लोकसंख्येची टक्केवारी | आदिवासी उपयोजने अंतर्गत क्षेत्र (चौ.कि.मी.) | आदिवासी उपयोजने अंतर्गत क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २९१८७३७ | २८.१२% | ३११०१ | ५६.०७% | ४२.०९% |
| मराठवाडा | ७४६०४१ | ७.१९% | १९८३ | ३.५८% | ५.३८% |
| उर्वरित महाराष्ट्र | ६७१५७८२ | ६४.६९% | २२३८२ | ४०.३५% | ५२.५२% |
| **एकूण** | **१०३८०५६०** | **१००.००%** | **५५४६६** | **१००.००%** | **१००.००%** |

आधार: जनगणना २०११ व आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

# जोडपत्र- ६ अ

उपलब्ध नियतवाटपातून अनुशेष दूर करणे, उर्वरित निधीचे नियत वाटपाच्या तत्त्वाधारे करावयाचे संवितरण, खर्चातील आधिक्य / तुटी आणि पुरवणी अर्थसंकल्प (२०१७-१८) यांतील दुरूस्ती, इत्यादींनुसार तीन प्रदेशांसाठी निधीचे नियतवाटप दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| | |
|---|---|
| सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्यय | ५८९२.६८ @ |
| अनुशेष दूर करण्यासाठी दिलेला नियतव्यय | ७५०.०० # |
| नियतवाटप तत्त्वानुसार नियतवाटपासाठी उपलब्ध नियतव्यय | ५१४२.६८ |

| प्रदेश | अनुशेष जिल्ह्यांसाठी विशेष नियतवाटप | लोकसंख्या व निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाण (सम प्रमाणात) | शिल्लक निधींचे संवितरण | आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ मधील खर्चातील आधिक्य /तुटीबाबत दुरूस्ती ** | २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात ५०० कोटी रुपयांच्या पुरवणी अर्थसंकल्पामुळे आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील सुधारणा | २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात २०० कोटी रुपयांच्या पुरवणी अर्थसंकल्पामुळे आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील सुधारणा | एकूण विभाज्य नियतव्ययाचे वाटप (स्तंभ ८ = स्तंभ २ + स्तंभ ४ + स्तंभ ५ + स्तंभ ६ + स्तंभ ७ ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| विदर्भ | ७५०.०० | २५.६५% | १३१९.१० | -२५५.०२ | -३७१.७५ | ५१.३० | **१४९३.६३** |
| मराठवाडा | ०.०० | २२.५४% | ११५९.१६ | १३२.३० | ११२.७० | ४५.०८ | **१४४९.२४** |
| उर्वरित महाराष्ट्र | ०.०० | ५१.८१% | २६६४.४२ | १२२.७२ | २५९.०५ | -९६.३८ | **२९४९.८१** |
| एकूण | ७५०.०० | १००% | ५१४२.६८ | ०.०० | ०.०० | ०.०० | **५८९२.६८** |

@ परिच्छेद १२ (च ) पहा. # परिच्छेद १३ (।) पहा

** दिनांक ११ मार्च २०१७ रोजीच्या निदेशांचे जोडपत्र ५ ड स्तंभ ७ पहा.

तळटीप: १. उणे (-) चिन्ह प्रदेशातून निधी काढून घेण्याबाबत दर्शविते.

२. अधिक (+) चिन्ह प्रदेशाला निधी उपलब्ध करण्याबाबत दर्शविते

## जोडपत्र ६ ब

आदिवासी लोकसंख्या व आदिवासी उपयोजना क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे *आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत* जलसंपदा निधीचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र

| | |
|---|---|
| *आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत* सिंचन क्षेत्रासाठीचा विभाज्य नियतव्यय | ₹५०.०० कोटी |

| प्रदेश | आदिवासी उपयोजनेचे प्रदेशनिहाय भारांक. | नियतवाटप (₹ कोटी) |
|---|---|---|
| विदर्भ | ४२.०९% | २१.०४ |
| मराठवाडा | ५.३८% | २.६९ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५२.५२% | २६.२७ |
| **एकूण** | **१००.००%** | **५०.००** |

## जोडपत्र ७

दिनांक ३१.३.२०१७ रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| ३१.०३.२००० ची स्थिती | ३१.०३.२०१३ ची स्थिती | ३१.०३.२०१४ ची स्थिती | ३१.०३.२०१५ ची स्थिती | ३१.०३.२०१६ ची स्थिती | ३१.०३.२०१७ ची स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १३५३.६७ | ५४२.१० | ४०२.८७ | २३९.१० | १७४.२३ | १३४.८० |

# जोडपत्र ८

*कार्यक्रमावरील खर्च* २०१८-१९ मधील (सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील) अनुशेष दूर करण्यासाठी नियतव्ययाचे क्षेत्र निहाय नियतवाटप दर्शविणारे विवरणपत्र

(₹ कोटी)

| अ. क्र. | क्षेत्र | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण | | | | |
| अ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ४.०० | ०.०० | ०.७५ | **४.७५** |
| ब | तंत्र निकेतन | ७.०४ | ४.९५ | २४.८२ | **३६.८१** |
| क | तंत्र माध्यमिक शाळा | २.०० | ०.०० | १.९५ | **३.९५** |
| २ | सार्वजनिक आरोग्य | ९.०५ | २४.०५ | ७५.२८ | **१०८.३८** |
| ३ | पंपसंचांचे विद्युतीकरण | ०.०० | ०.०० | ५०.०० | **५०.००** |
| | एकूण (१+२+३) | **२२.०९** | **२९.००** | **१५२.८०** | **२०३.८९** |

**तळटीप:** उपरोक्त नियतवाटपाखेरीज, परिच्छेद ३२ मध्ये विशद केलेल्या प्रयोजनांकरिता **₹२ कोटी** इतकी रक्कम प्रत्येक विकास मंडळाकरिता राखून ठेवण्यात येईल.